# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**प्रेसनोट** दिनांक ०४/०२/२०२२

**" पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये धारदार शस्त्रे व अग्नीशस्त्रे वापरुन गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांच्या विरुध्द कारवाई केलेबाबत "**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये धारदार शस्त्रे व अग्नीशस्त्रे वापरुन गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांच्या विरुध्द कारवाई करण्यासाठी मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे, मा.सह पोलीस आयुक्त, श्री मनोज लोहिया, मा.अपर पोलीस आयुक्त, श्री संजय शिंदे, मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, स्वप्ना गोरे मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ श्री. विवेक पाटील, व मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२ श्री. काकासाहेब डोळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १९ जानेवारी ते ०३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीमध्ये विशेष मोहिम राबविण्यात येवून आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशन व गुन्हे शाखा, युनिट यांना कारवाईकरिता आदेशीत करण्यात आले होते.

या मोहिमेअंतर्गत मोठया प्रमाणावर शस्त्रे व अग्नीशस्त्र जप्त करण्यात येवून अग्नीशस्त्र बाळगणारे इसमांचे विरुध्द ३६ गुन्हे, धारदार शस्त्राचा वापर करणाऱ्यांविरुध्द १५० गुन्हे मोहिमेअंतर्गत दाखल करण्यात आले आहेत. तसेच सदर गुन्हयात एकूण २११ आरोपींना अटक करण्यात येवून त्यांचेकडून **अग्नीशस्त्रे ४८, धारदार शस्त्रे २०५ असे एकूण २५३** शस्त्रे जप्त करण्यात आलेली आहेत.

या मोहिमेमध्ये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेकडील **प्रथम क्रमांक दरोडा विरोधी पथक, द्वितीय क्रमांक गुंडा विरोधी पथक व तृतीय क्रमांक युनिट -४ यांनी मिळवला आहे. त्याचप्रमाणे पोलीस स्टेशन स्तरावर महाळुंगे, शिरगांव, पिंपरी** या पोलीस स्टेशन कडून उत्कृष्ट कामगिरी करण्यात आली आहे.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या घटक प्रमुखांना व अंमलदारांना मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेकडून प्रशस्तीपत्र देण्यात येवून गौरविण्यात आले आहे. तसेच यापुढील काळातही हत्यार वापरुन गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाईची मोहिम चालूच राहणार आहे.

Scanned with CamScanner